12 NOV 2024 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंद्रधनुष्य युवा महोत्सवात विद्यापीठाला उपविजेतेपद

▪ अकोला येथे नुकत्याच पार पडल्या राज्य आंतरविद्यापीठ स्पर्धा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सव २०२४-२०२५ अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात पार पडल्या. या महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाने २९ कलाप्रकारात सहभाग नोंदवला. गतवर्षीप्रमाणेच यंदाही इंद्रधनुष्य युवा महोत्सवाचे सांघिक उपविजेतेपद शिवाजी विद्यापीठाने पटकावले आहे. तसेच संगीत विभागात सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. तर विद्यापीठ संघाने एकूण १२ बक्षिसे प्राप्त केली आहेत.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सव शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील ४२ विद्यार्थी, ९ व्यावसायिक साथीदार, दोन संघ व्यवस्थापक प्रशासकीय सेवक, सांस्कृतिक मार्गदर्शक, संचालक असे ५५ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. या युवा महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने ललित कला, वाङ्मय, संगीत, नृत्य व नाटक असा २९ स्पर्धामध्ये सहभाग नोंदवला. या स्पर्धामध्ये चांगले यश संपादन केले.

विजयी संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य व युवा महोत्सव समिती सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, माजी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवात उपविजेतेपदाचे बक्षिस स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा संघ.

**यश मिळवलेले कलाप्रकार** - माती काम : व्दितीय, रांगोळी : तृतीय, सांघिक रचनाकृती : तृतीय, भारतीय शास्त्रीय एकल गायन : प्रथम, भारतीय शास्त्रीय ताल वाद्य : प्रथम, नाट्य संगीत एकल गायन : व्दितीय, एकल सुगम गायन : तृतीय, भारतीय समूह गीत : तृतीय, लोक वाद्यवृंद : प्रथम क्रमांक, पाश्चिमात्य एकल गायन : तृतीय, पाश्चिमात्य एकल वादन : प्रथम, पाश्चिमात्य समूह गायन : तृतीय, सांस्कृतिक फेरी : व्दितीय.

12 NOV 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : अकोला येथे झालेल्या आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवात सर्वसाधारण उपविजेतेपद मिळवलेला शिवाजी विद्यापीठ संघ. (नाज ट्रेनर)

# आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ सर्वसाधारण उपविजेता

## विविध कलाप्रकारांमध्ये १३ बक्षिसे; संगीत विभागाचे विजेतेपद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे झालेल्या राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवात सलग दुसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठाने सर्वसाधारण उपविजेतेपद व संगीत विभागातील सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे. विविध कलाप्रकारांमध्ये विद्यार्थी कलाकारांनी १३ बक्षिसे मिळवली.

युवा महोत्सवामध्ये नृत्य, नाट्य, ललित कला, संगीत आणि वाङ्मय कलाप्रकारात २९ स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. शिवाजी विद्यापीठाने माती काम- द्वितीय क्रमांक, रांगोळी- (तृतीय), सांघिक रचनाकृती - (तृतीय), भारतीय शास्त्रीय एकल गायन- (प्रथम), भारतीय शास्त्रीय ताल वाद्य- (प्रथम), नाट्य संगीत एकल गायन - (द्वितीय), एकल सुगम गायन- (तृतीय), भारतीय समूहगीत- (तृतीय), लोक वाद्यवृंद- (प्रथम), पाश्चिमात्य एकल गायन- (तृतीय), पाश्चिमात्य एकल वादन- (प्रथम), पाश्चिमात्य समूह गायन- (तृतीय), सांस्कृतिक फेरी- द्वितीय क्रमांक पटकाविला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य व युवा महोत्सव समिती सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, संचालक डॉ. टी. एम. चौगले, सांस्कृतिक समन्वयक दीपक बिडकर यांचे मार्गदर्शन लाभले. महोत्सवासाठी संघ व्यवस्थापक म्हणून हेमंत रकटे, डॉ. उज्ज्वला बिरजे यांनी तर विद्यार्थी विकास विभागाचे कर्मचारी विजय इंगवले, सुरेखा अडके यांचे सहकार्य लाभले.

### ५५ सदस्यांचा संघ सहभागी

राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील निवडक ४२ विद्यार्थी, ७ व्यावसायिक साथीदार, २ संघ व्यवस्थापक, प्रशासकीय सेवक, सांस्कृतिक समन्वयक, संचालक विद्यार्थी विकास असा एकूण ५५ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता.

12 NOV 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी विधी महाविद्यालयाची 'कलम ३७५' एकांकिका सर्वोत्कृष्ट

## पुरुषोत्तम करंडक स्पर्धा : सांघिकमध्ये डी. वाय. पाटीलची 'पिंडग्रान' प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कलोपासक पुणे व गायन समाज देवल क्लब, शिवाजी विद्यापीठ संगीत नाट्यशास्त्र विभाग यांच्या सहकार्याने झालेल्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत शहाजी विधी महाविद्यालयाच्या 'कलम ३७५' एकांकिकेने पहिले पारितोषिक पटकावले. सांघिक गटात डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या 'पिंडग्रान' एकांकिकेची निवड झाली.



कोल्हापुरात देवल क्लब येथे रंगलेल्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या 'पिंडग्रान' एकांकिकेतील कलाकारांनी सांघिकमधीतल प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारले.

पुणे येथील राज्यस्तरीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत या एकांकिकांची निवड झाली. ज्येष्ठ रंगकर्मी संजय हळदीकर, उमा नामजोशी यांच्या हस्ते देवल क्लब येथे समारंभात विजेत्यांना पारितोषिके दिली. कलोपासक पुणे व गायन समाज देवल क्लब, शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने गोविंदराव टेंबे रंगमंदिरात पुरुषोत्तम करंडक स्पर्धा पार पडल्या. कोल्हापूर, सांगली, सातारा येथील २० महाविद्यालयीन संघांनी भाग घेतला.

उत्तेजनार्थ अभिनय : नेहा सावंत (शिवाजी विद्यापीठ), अथर्व होगाडे (दत्ताजीराव कदम इन्स्टिट्यूट, इचलकरंजी), श्रेया माने (राजारामबापू अभियांत्रिकी कॉलेज, साखराळे), मानसी बोळुदे (शहाजी लॉ कॉलेज), मनोज्ञा हुद्दार (चिंतामणराव व्यापार महाविद्यालय), अभिनय नैपुण्य अभिनेता/अभिनेत्री : प्रायोगिक, शहाजी विधी महाविद्यालयाच्या 'कलम ३७५'चे गंधार जोग, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या 'म्हातारी'साठी अक्षता बारटक्के यांना पारितोषिक मिळाले. सांघिककरिता डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकीच्या 'पिंडग्रान' एकांकिकेसाठी समर्थ तपकिरे, शिवाजी विद्यापीठातील 'बांध' एकांकिकेसाठी द्रुता कुलकर्णी, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक म्हणून गंधार जोग व दिग्दर्शक म्हणून अभिषेक हिरेमठ यांना पारितोषिके दिली. अभिनेता दिलीप बापट, पवन खेबूडकर, डॉ. संजीवकुमार पाटील, देवल क्लबचे सुबोध गद्रे, अजित कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

12 NOV 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



अकोला येथे आयोजित इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने उपविजेतपद पटकाविले.

# शिवाजी विद्यापीठाने पटकावले उपविजेतपद

## इंद्रधनुष्य युवा महोत्सव : डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापीठात आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने उपविजेतपद पटकाविले.

यामध्ये शिवाजी विद्यापीठातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यातील निवडक ४२ विद्यार्थी, सात व्यावसायिक साथीदार, दोन संघ व्यवस्थापक, प्रशासकीय सेवक, सांस्कृतिक समन्वयक, संचालक विद्यार्थी विकास असा एकूण ५५ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता.

या युवा महोत्सवामध्ये नृत्य, नाट्य, ललित कला, संगीत आणि वाङ्मय या कलाप्रकारात एकूण २१ स्पर्धात सहभाग नोंदवला. यात शिवाजी विद्यापीठाने सर्वसाधारण उपविजेतपद तसेच संगीत विभागातही सर्वसाधारण विजेतपद पटकावले. विद्यापीठाच्या संघाने १३ बक्षिसे मिळवली. या संघास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड, संचालक डॉ. टी. एम. चौगले, दीपक बिडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कला विभागासाठी बबन माने, संग्राम भालकर, नृत्य विभागासाठी गणेश इंडीकर, आकाश लिगाडे, थिएटर विभागासाठी शंतनू पाटील, संदीप जंगम, मयुरेश पाटील, ऋषिकेश देशमाने, नितीन शिंदे, सुमंत कुलकर्णी, चैतन्य देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. टीम मॅनेजर म्हणून हेमंत रकटे, डॉ. उज्ज्वला बिरजे यांनी तर विद्यार्थी विकास विभागाचे विजय इंगवले, सुरेखा अडके यांचे सहकार्य लाभले.

12 NOV 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेतर्फे मतदान जनजागृतीसाठी शहरातील १५ कॉलेजच्या विद्यार्थ्यांमार्फत दि. १७ नोव्हेंबरअखेर पथनाट्याचे व रॅलीचे आयोजन केले आहे. त्याची सुरुवात सोमवारी सकाळी महापालिकेच्या विठ्ठल रामजी शिंदे चौकातून केली.

सोमवारी के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगकडील एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय व कावळा नाका येथील स्टार बाजार येथे पथनाट्य सादर केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, सहायक आयुक्त नेहा आकोडे, आर. व्ही. कांबळे व मनपाचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दि. १७ नोव्हेंबरपर्यंत के.आय.टी., कॉमर्स, छत्रपती शाहू, सायबर, महावीर, न्यू शासकीय तंत्रनिकेतन, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजतर्फे पथनाट्य, शहाजी, कमला, उषाराजे हायस्कूल, मेन राजाराम, डी. डी. शिंदे सरकार, डॉ. डी. वाय. पाटील, न्यू कॉलेजतर्फे रॅलीचे आयोजन, गोखले कॉलेजतर्फे मतदान जनजागृतीवर पोवाडा सादर केला जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2024
लोकमत

# हिवाळी सत्रातील परीक्षा आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील परीक्षांना आज, मंगळवारपासून सुरुवात होणार आहे. यात पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश आहे. आजपासून पीजी डिप्लोमाच्या १० परीक्षांना प्रारंभ होणार आहे. परीक्षेला ५०० हून अधिक विद्यार्थी बसणार आहेत. सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवडणूक कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पदवी, पदव्युत्तर प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ नोव्हेंबरपासून सुरू होतील. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील एक लाखाहून अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2024
पुढारी

# 'घाळी'च्या सहा खेळाडूंची हॉकी स्पर्धेसाठी निवड

गडहिंग्लज : येथील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या महिला हॉकी संघाने सलग तिसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. यापैकी सहा खेळाडूंची जयपूर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

यामध्ये अमृता भोसले, वासंती वाढगोळ, कृष्णा माने, स्वाती फुटाणे, मोनिका आरबोळे, या खेळाडूंना उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव बी. जी. भोसकी, सहसचिव सीए गजेंद्र बंदी, अ‍ॅड. विकास पाटील, संगाप्पाणा दड्डी, डॉ. शिवकुमार कोल्हापुरे, इंजि. किशोर हंजी आदींचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 NOV 2024 पुण्यनगरी

# डॉ. घाळी महाविद्यालयाच्या हॉकीपटूंची निवड

गडहिंग्लज : येथील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या महिला हॉकी संघाने सलग तिसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकावले. त्यापैकी सहा खेळाडूंची जयपूर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झाली.

यामध्ये अमृता भोसले, वासंती वाढगोळ, कृष्णा माने, स्वाती फुटाणे, मोनिका आरबोळे, स्वप्नाली माने यांचा समावेश आहे. त्यांचा संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

खेळाडूंना उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव बी. जी. भोसकी, सहसचिव गजेंद्र बंदी, ॲड. विकास पाटील, संगाप्पाणा दड्डी, शिवकुमार कोल्हापुरे, किशोर हांजी, महेश घाळी, प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांचे प्रोत्साहन, तर विकास अतिग्रे, मनोहर मांगले यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2024
तरुण भारत



गडहिंग्लज : डॉ. घाळी कॉलजचे हॉकीसाठी निवड झालेले खेळाडू.

# डॉ. घाळी कॉलेजच्या खेळाडूंची हॉकीसाठी निवड

प्रतिनिधी
गडहिंग्लज

डॉ. घाळी कॉलेजच्या हॉकी संघाने सलग तीसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे. या संघातील अमृता भोसले, वासंती वाढगोळ, कृष्णा माने, स्वाती फुटाणे, मोनिका आरबोळे, स्वप्नाली माने यांची शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

जयपूर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत हे खेळाडू खेळणार आहेत. त्यांचा संस्थाध्यक्ष डॉ. सतिश घाळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य दत्ता पाटील यांच्यासह अन्य उपस्थित होते. या खेळाडुंना विकास अतिग्रे, मनोहर मांगले यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2024
तरुण भारत

# पदविका, पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील डिप्लोमा व सर्टीफिकेट कोर्स परीक्षा व पीएच.डी. प्रवेश पूर्व परीक्षांना मंगळवार (दि. १२) पासून प्रारंभ होणार आहे. पीएच. डी. प्रवेश पूर्व परीक्षेला ३ हजार २२० विद्यार्थी बसणार आहेत. त्याचबरोबर रिसर्च ॲण्ड पब्लिकेशन इथेक्स परीक्षा १६ नोव्हेंबरला होईल. तर पदवी व पदव्युत्तरच्या ८५० परीक्षांना २५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे. परीक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पीएच. डी. प्रवेशपूर्व परीक्षा कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन परीक्षा केंद्रावर १२ ते १३ नोव्हेंबर दरम्यान होणार आहेत. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका शिवाजी विद्यापीठाने तयार केलेल्या स्वतःच्या एसआरपीडी सिस्टमच्या माध्यमातून पाठवल्या जाणार आहेत. महाविद्यालय व अधिविभागातील एसआरपीडी समन्वयकांना सोमवारी एसआरपीडीच्या वापरासंदर्भात प्रशिक्षण दिले. विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा २५ नोव्हेंबरपासून सुरू होत आहेत. ही परीक्षा १ लाख ८५ हजार १९३ विद्यार्थी देणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाने प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका आणि परीक्षा केंद्रांची संपूर्ण तयारी केली आहे. तसेच परीक्षेत कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून बैठ्या व फिरत्या भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.